# ९. ऐतिहासिक ठेव्यांचे जतन

**इतिहासाची साधने आणि त्यांचे जतन**

इतिहासाची साधने मिळवणे, त्यांच्या नोंदी करणे, त्यांची सूची तयार करणे, हस्तलिखित, जुने ग्रंथ, त्यांची सफाई, त्यांचे जतन इत्यादी गोष्टी काळजीपूर्वक कराव्या लागतात. त्यासाठी योग्य प्रशिक्षण हवे.

**मौखिक साधने :** १. लोकपरंपरेतील गीते, कहाण्या इत्यादींचे संकलन करणे. २. संकलित साहित्याचे वर्गीकरण, विश्लेषण करणे. ३. संशोधित मौखिक साहित्य प्रकाशित करणे.

**उपयुक्त प्रशिक्षण:** समाजशास्त्र, सामाजिक मानवशास्त्र. मिथके आणि भाषाशास्त्र, ग्रंथालय व्यवस्थापन, इतिहास संशोधन, संशोधन पर लेखन.

लिखित साधने : १. ताम्रपट, दरबारी पत्रे, खाजगी पत्रे, दैनंदिनी, हस्तलिखिते, ऐतिहासिक ग्रंथ, चित्रे, छायाचित्रे, जुने ग्रंथ इत्यादी चे संकलन करणे.

२. दस्तऐवजाच्या संवर्धनासाठी त्यांची सफाई व रासायनिक प्रक्रिया करणे.

३. दस्तऐवजांचे ऐतिहासिक मूल्य निश्चित करणे.

उपयुक्त प्रशिक्षण : ब्राह्मी, पर्शियन, मोडी लिपीचे ज्ञान मिळवणे, इतिहासकालीन समाजरचना, परंपरा, साहित्य, संस्कृती, इत्यादी चे ज्ञान, चित्रशैली, शिल्पशैली यांचे ज्ञान कागदाचे प्रकार, शाई रंग यांचे ज्ञान कोरीव लेखांसाठी वापरलेला दगड, धातू यांच्या स्वरूपाविषयी माहिती, संशोधन पर लेखन, संग्रहालय व्यवस्थापन, दस्ताऐवजांची सफाई आणि संवर्धन यांसाठी लागणारी रासायनिक प्रक्रिया यांची माहिती.

भौतिक साधने : अ) पुरावस्तूंचे संकलन, कालखंडानुसार वर्गीकरण करणे, सूची तयार करणे.

ब) पुरावस्तूंचे संवर्धन करण्यासाठी आवश्यक गोष्टी, सफाई व रासायनिक प्रक्रिया करणे.

क) निवडक पुरावस्तू व त्यांच्या प्रतिकृती प्रदर्शित करणे त्यासंबंधी संशोधनपर लेखन प्रसिद्ध करणे.

ड) वनस्पती व प्राणी यांचे अश्मीभूत अवशेष (जीवाश्म) यांचे वर्गीकरण करणे.

उपयुक्त प्रशिक्षण :- १) पुरातत्वीय अभ्यासपद्धती, सिध्दांत, प्राचीन संस्कृती यांचा परिचय २) पुरातत्वीय वस्तूंचे दगड, खनिजे, धातू, चिकणमाती इत्यादींच्या रसायनशास्त्रीय वैशिष्ट्यांचे ज्ञान. ३) पुरातत्वीय वस्तूंची सफाई, रसायनांची माहिती ४) पुरावस्तू व जीवाश्म यांच्या प्रतिकृती बनवण्याचे कौशल्य. ५)संशोधनपर लेखन.

काही नावाजलेली संग्रहालये :- लुव्र संग्रहालय - फ्रान्स - हे संग्रहालय पॅरिसमध्ये आहे. त्याची स्थापना इसवीसन अठराव्या शतकात झाली. फ्रेंच राजघराण्यातील व्यक्तींनी जमा केलेल्या कला वस्तूंचे हे संग्रहालय आहे. यात 'लिओनार्दो द विंची' या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराचे 'मोनालिसा' हे चित्र तेथे आहे. नेपोलियन बोनापार्ट ने आणलेल्या देश-विदेशातल्या कलावस्तू तेथे आहेत. त्यात अश्मयुगीन ते आधुनिक काळातील ३लाख ८० हजाराहून जास्त कलावस्तू आहेत.

२) ब्रिटिश संग्रहालय, इंग्लंड - लंडनमध्ये इसवीसनाच्या १८ व्या शतकात या संग्रहालयाची स्थापना झाली. सर हॅन्स स्लोअन या निसर्गशास्त्रज्ञाने इंग्लंडचा राजा दुसरा जॉर्ज याला एकाहत्तर हजार वस्तू दिल्या. त्यात अनेक अनेक ग्रंथ, चित्रे, वनस्पतींचे नमुने इत्यादी होते. इंग्रजांनी त्याच्या वसाहतीतून आणलेल्या कलावस्तू, प्राचीन अवशेष तेथे आहेत. ऐंशी लाख वस्तू त्यात आहेत .

३) नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका :- इसवीसन १८४६ मध्ये हे संग्रहालय सुरु झाले. वनस्पती, प्राणी यांचे अवशेष, जीवाश्म खनिजे, दगड, मानव प्रजातींचे अश्मीभूत अवशेष आणि पुरावस्तू यांचे बारा कोटीहून अधिक नमुने येथे आहेत.

भारतातील संग्रहालये -

इ.स. १८७४ मध्ये 'भारतीय संग्रहालय' कोलकाता येथे स्थापन झाले. इ.स. १८५१ मध्ये गव्हर्मेंट म्युझियम चेन्नई येथे सुरु झाले. इ.स. १९४९ मध्ये राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाची स्थापना दिल्ली येथे झाली.

संग्रहालयशास्त्रातील पदवी आणि पदविका अभ्यासक्रम उपलब्ध करून देणाऱ्या संस्था व विद्यापीठे:

१) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय - दिल्ली.
२) महाराजा सयाजीराव विद्यालय-वडोदरा.

३) कोलकाता विद्यापीठ - कोलकाता.
४) बनारस हिंदू विद्यालय - वाराणसी.
५) अलिगड मुस्लीम युनि- अलीगड.
६) शिवाजी विद्यापीठ - ग्वालियर.

छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय मुंबई – या संग्रहालयाची वास्तू इंडो-गोथिक शैलीत बांधली गेलेली आहे. तिला पहिल्या प्रतीची सांस्कृतिक वारसा इमारत असा दर्जा देण्यात आला आहे. यात पन्नास हजार पुरातत्त्व वस्तू आहेत.

**ग्रंथालये आणि अभिलेखागार –**

ग्रंथालये ही ज्ञानाची, माहितीची भांडारगृहे असतात. ग्रंथांचे संकलन, त्यांचे पद्धतशीर आयोजन, जतन-संवर्धन ही महत्त्वाची कामे ग्रंथालयामार्फत पार पडली जातात. वाचकांच्या आवश्यकतेनुसार हवे तेव्हा नेमके ग्रंथ उपलब्ध करून देणे या गोष्टींना ग्रंथालय व्यवस्थापनात अत्यंत महत्त्व आहे.

**सर्वात प्राचीन ग्रंथालये :**

१. तक्षशीला विद्यापीठ येथील ग्रंथालय ( इ.स. पू पाचवे शतक ते इ.स.५ वे शतक )
२. मेसोपोटेमियातील ग्रंथालय (इ.स. पू. ७ वे शतक)
३. इजिप्त मधील अलेक्झांड्रिया येथील ग्रंथालय ( इ.स. पूर्व ४ थे शतक )

**भारतातील ग्रंथालये -**

१. सरस्वती महाल ग्रंथालय - तामिळनाडू तंजावर येथे १६ व्या शतकात बांधले गेले.

व्यंकोजीराजे भोसले व त्यांच्या वंशजांनी हे ग्रंथालय समृद्ध केले. येथे एकोणपन्नास हजार ग्रंथ आहेत.

२. नॅशनल लायब्ररी – कोलकाता

३. नेहरू मेमोरियल म्युझियम अँड लायब्ररी – दिल्ली

४. स्टेट सेंट्रल लायब्ररी – हैदराबाद

५. लायब्ररी ऑफ एशियाटिक सोसायटी - मुंबई

**अभिलेखागार**

ग्रंथालय व्यवस्थापनासाठी अभिलेखागाराचे व्यवस्थापन आवश्यक आहे. महत्त्वाच्या नोंदी असलेली कागदपत्रे सुरक्षित ठेवणे, त्याच्या सूची तयार करणे हे अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात महत्त्वाचे असते. संगणकामुळे ग्रंथालय व अभिलेखागार हे माहिती तंत्रज्ञानाशी जोडले गेले आहेत.

१. इंपिरियल रेकॉंड डिपार्टमेंट - कोलकाता येथे १८९१ मध्ये स्थापन झाले. ते १९११ मध्ये दिल्लीला आणले. भारतातील हे पहिले सरकारी अभिलेखागार आहे. इ.स. १९९८ मध्ये राष्ट्रीय अभिलेखागार म्हणून ते जनतेसाठी खुले केले. इसवी सन १७४८ पासूनची कागदपत्रे इथे आहेत .
२. महाराष्ट्र राज्य शासनाच्या अभिलेखागार संचालनालयाच्या शाखा मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद आणि नागपूर येथे आहेत.

**कोशवाङ:मय**

कोश म्हणजे शब्दांचा, विविध माहिती, ज्ञानाचा केलेला पद्धतशीर संग्रह. विविध ज्ञानाचे विशिष्ट पद्धतीने केलेले संकलन आणि मांडणी म्हणजे कोश.

**कोशाची आवश्यकता**

कोशामुळे वाचकांपर्यंत ज्ञान पोचवले जाते. जिज्ञासा पूर्ण करून एखाद्या मुद्द्याचा सविस्तर उलगडा केला जातो.

कोशातील माहितीच्या मांडणीकरिता अचूकपणा, नेमकेपणा, वस्तुनिष्ठता, अद्ययावतता इ. गोष्टी आवश्यक असतात. अद्ययावतता राखण्यासाठी कोशांच्या सुधारित आवृत्त्या काढाव्या लागतात.

कोशरचना करताना अकारविल्हे व विषयवार अशा दोन पद्धती वापरतात. कोशाच्या शेवटी सूची असते. त्यामुळे वाचकाची सोय होते.

**कोशाचे प्रकार : १. शब्दकोश २. विश्वकोश ३. कोशसदृश वाङःमय ४. सूची वाङःमय.**

१. **शब्दकोश :** यात शब्दांचा संग्रह, शब्दांचा अर्थ, प्रतिशब्द, पर्यायी शब्द, शब्दांची व्युत्पत्ती दिलेली असते.

२. **विश्वकोश :** विश्वकोशाचे दोन भाग पडतात. **अ)** सर्वसंग्राहक उदा. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, मराठी विश्वकोश. **ब)** विशिष्ट विषयपर कोश - हे एखाद्या विषयाला वाहून घेतलेले कोश असतात. उदा. भारतीय संस्कृती कोश, व्यायाम ज्ञानकोश.

३. **कोशसदृश्य वाङःमय :** यात एखाद्या विषयाची समग्र मांडणी केलेली असते. उदा. महाराष्ट्र जीवन खंड – १,२, शहर पुणे खंड – १,२.

४. **सूचिवाङःमय :** ग्रंथाच्या अखेरीस दिलेली त्या ग्रंथातील व्यक्ती, विषय, स्थळे व ग्रंथ यांची यादी म्हणजे सूची. सूची अकारविल्हे असून त्या-त्या ग्रंथाच्या वाचनास मदत करते.

**कोश आणि इतिहास :** इतिहास व कोशात वस्तुनिष्ठतेला महत्त्व असते. स्वराष्ट्राची ध्येयधोरणे, जीवनमूल्ये, आदर्श यांचा प्रभाव कोशावर पडतो. राष्ट्रीय अस्मिता जागी करण्याचा प्रयत्न कोशांद्वारे करता येतो. उदा. भारतीय संस्कृती कोश (महादेवशास्त्री जोशी) समाजाची प्रज्ञा व प्रतिभा यांचा अविष्कार कोशरचनेत म्हणून कोश म्हणजे समाजाचे मानचिन्हच समजले जाते .

**इतिहास विषयाशी संबंधित कोश :** इतिहास या विषयातील कोशपरंपरा समृद्ध आहे. **उदा .** भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश १८७६ रघुनाथ भास्कर गोडबोले हा आद्यकोश होय. यात प्राचीन काळातील भारतीय व्यक्ती व स्थळे आहेत.

**महाराष्ट्रीय ज्ञानकोश** - श्रीधर व्यंकटेश केतकर

यांचे २३ खंड आहेत. मराठी माणसांना बहुश्रुत करणे हा उद्देश आहे.

भारतवर्षीय प्राचीन ज्ञानकोश - सिद्धेश्वर शास्त्री चित्राव (१९३२)

भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश -१९३७

भारतवर्षीय अर्वाचीन चरित्रकोश १९४६ असे तीन चरित्रकोश प्रसिद्ध केले. या कोशात श्रुती, स्मृती, सूत्रे, उपनिषदे, पुराणे इ. ची माहिती आहे.

**स्थळकोश** : इतिहासाच्या अभ्यासासाठी भूगोल महत्त्वाचा आहे. विविध ऐतिहासिक स्थळांच्या संदर्भात माहिती देणारे कोश आहेत.

**स्थान पोथी ग्रंथ** - मुनी व्यास, महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधरस्वामी ज्या ज्या गावी गेले त्या त्या गावांची त्यात नोंद आहे.

१. **प्राचीन भारतीय स्थळकोश** - (१९९९) सिद्धेश्वर शास्त्री वैदिक साहित्य, कौटिलीय अर्थशास्त्र, पाणिनीचे व्याकरण, वाल्मिकी रामायण, महाभारत, पुराणे, जैन, बौद्ध, ग्रीक साहित्य, यामधील भौगोलिक स्थळांची माहिती त्यात आहे.

२. **विश्वकोश** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली विश्वकोश निर्माण झाला. यात जगभरातील ज्ञान साररूपाने आणले आहे. इतिहास विषयाशी निगडीत असणाऱ्या महत्त्वाच्या नोंदी यात आहेत.

३. **भारतीय संस्कृती कोश** - महादेवशास्त्री जोशी यांच्या संपादनाखाली भारतीय संस्कृती कोशाचे दहा खंड तयार केले. भारताचा इतिहास, भूगोल, राहणीमान, सण-उत्सव, सांस्कृतिक बाबी वर्णिल्या आहेत.

**संज्ञा कोश** - इतिहासातील संज्ञा वेगळ्या काढून त्या समजावून सांगणारे कोश इतिहासात तयार करतात. अभ्यासकांना त्याचा फायदा होतो. इतिहास विषयाच्या अभ्यासकांना कोश रचनेच्या अभ्यासात भरपूर संधी आहे.